माहिती घ्या, माहिती

सोहराब मोदींचा दबदबा

सोहराब मोदी हे चरित्रपटांचे नायक होते. पण त्यांची बलदंड शरीरयष्टी, धारदार आवाज आणि बोलण्याची विशिष्ट लकब त्यांना पौराणिक चित्रपटांचा नायक म्हणून प्रसिध्दी देऊन गेली. शेक्सपिअरच्या नाटकांवर आधारित चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका प्रचंड गाजल्या. सिकंदर, पृथ्वी वल्लभ, राजहट असे चित्रपट त्यावेळी सोहराब मोदींचे चित्रपट म्हणून गाजले. त्यांनी चित्रपटसृष्टीला अभिनयाव्यतिरीक्त दिलेलं योगदानही महत्त्वाचं आहे. त्यांनी आपले मोठे भाऊ रुस्तम यांच्याबरोबर ग्वाल्हेरच्या टाऊन हॉलमध्ये १९१४ मध्ये फिरत्या चित्रपटगृहांची सुरुवात केली. १९२५ ते ३१ या काळात त्यांनी संपूर्ण भारताचा दौरा करुन नाटकांसाठी योग्य वातावरण तयार करायला मदत केली. त्यांच्यावर नाटकांच्या संवादफेकीचा परिणाम अधिक होता. ते आपले चित्रपटातले संवादही नाटकाच्या भाषेत आणि लयीतच बोलायचे. पण त्यांचा आवाज सिंहाने फोडलेल्या डरकाळीप्रमाणे भासायचा. म्हणूनच कदाचित त्यांना अधिक लोकप्रियता मिळाली असावी. १९८० मध्ये त्यांना भारतीय सिनेसृष्टीतला सर्वोच्च समजला जाणारा दादासाहेब फाळके पुरस्कारही मिळाला आहे.

पृथ्वीराज कपूर यांच्याप्रमाणे तेही नाटकाचे निस्सीम भक्त होते. त्या प्रेमापोटीच त्यांनी भारतात रंगभूमी प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले. असा कलाकार पुन्हा न होणे.

***